शुक्रवार दि.५ एप्रिल २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २२४
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत
संपादक : ज्ञानेश्वर मुंढे



सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४



Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | www. lokneta.com


# विरोधकांना संपवून हुकूमशाही आणण्याचा बीजेपीचा डाव-विरोध पक्षनेते वडेट्टीवारांचा भाजपवर हल्लाबोल

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नागपूर (वृत्तसंस्था)**

देशांतील प्रत्येक नागरिकांला समान हक्क व जगण्याचा अधिकार मिळावा यासाठी भारतरत्न डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांनी लोकशाही पुरस्कृत संविधान लिहून देशाला उत्तम घटना दिली. मात्र सध्याच्या केंद्रातील मनुस्मृति विचारांचे सरकारने देशांतील नागरिकांची लूट करुन, धर्मांधतेच्या नावावर दिशाभूल करीत व्यापारी हित जोपासून देशाच्या नागरिकांचे रक्षण कवच असलेल्या पवित्र संविधान पूर्णतः बदलण्याचा प्रयत्न चालविला आहे. आगामी लोकसभा निवडणुकीत भाजपला रोखले नाही तर स्वतंत्र भारताचे गुलाम म्हणुन जगावे लागेल.हि अंतीम निवडणुक समजून हुकूमशाही आणू पाहणाऱ्या भाजपा सरकारला सत्तेतून हद्दपार करा असे प्रतिपादन राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केले. ते गडचिरोली – चिमूर लोकसभा क्षेत्राचे इंडिया आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. नामदेव किरसान यांचे प्रचारार्थ नागभिड येथे आयोजीत सभेत बोलत होते.

आयोजीत प्रचार सभेस प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार डॉ. अविनाश वारजुरकर , इंडिया आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ नामदेव किरसान, माजी जिल्हा परिषद सदस्य पंजाबराव गावंडे, काँग्रेस अनु. जाती सेल जिल्हाध्यक्ष प्रफुल खापर्डे, हसन गिलानी,,काँग्रेसचे चीमुर विधानसभा समन्वयक डॉ.सतीश वारजुरकर, ओबीसी प्रदेश संघटक धनराज मुंगले, ड. गोविंद भेंडारकर, नरेंद्र हेमने, डॉ.कावळे , मंगेश सोणकुसरे, भास्कर शिंदे, डॉ. रघुनाथ बोरकर, विनोद बोरकर, खोजराम मरस्कोल्हे, साहिस वारजुरकर प्रामुख्याने मंचावर उपस्थित होते.पुढे बोलतांना विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, देशांतील शेतकरी, कामगार, युवक नोकरदार वर्ग व सर्व नागरीक मोठ्या प्रमाणात त्रस्त झाले आहेत. महागाई, बेरोजगारी, खाजगीकरण यामुळे अगोदरच जनतेचे कंबरडे मोडले असुन आता विरोध करणार्या विरोधकांना संपविण्याचा डाव आखला जात आहे. खते, जीवनावश्यक वस्तू, पेट्रोल, डिझेल, गॅस यात प्रचंड दरवाढ व जीएसटी



च्या माध्यमातून जनतेची लूट केल्या जात आहे.अश्या निष्ठूर सरकार विरुद्ध आता पेटून उठून देशातील संविधान टिकविण्यासाठी इंडिया आघाडीच्या पाठीशी उभे राहणे गरजेचे आहे. देश सुरक्षित नाही, देशांतील महीला सुरक्षित नाही, महीला खेळाळूचे शोषण करणारे मोकाट फिरत आहे. अशी अवस्था देशाची झाली आहे.तर विद्यमान खासदार अशोक नेते हे संसदेत मौन धारण करून बसतात अश्या मौनी बाबाला उत्कृष्ट संसद पटू पुरस्कार देतात हि हास्यास्पद बाब असल्याची टीका विरोध पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी यावेळी केली.तर देशातील भाजप सरकार हे आदिवासी, शेतकरी, कामगार, युवक विरोधी सरकार असुन देशाच्या शेतकऱ्यांना आजवर हमीभाव दिला नाही. . देशांत तानाशाही सुरु असुन पक्ष फोडल्या जात असल्याचे माजी आ. डॉ. अविनाश वारजुरकर यांनी यावेळी सांगितले.देशात सत्तापीपासून्नी बहुजनांना धर्म जातीमध्ये विभागून तसेच स्वतःचा पराभव दिसताना पुलवामा सारखे कांड घडवून निष्पाप सैनिकांचा बळी घेतल्याचे व त्यातून सत्ता काबीज केल्याचे पाप केले गेले आहे. अशा निष्ठावर निर्णय सरकारला अर्ज पार करण्यासाठी मला सेवेची संधी द्यावी असे प्रतिपादन इंडिया आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. नामदेव कीरसान यांनी केले. तत्पूर्वी राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या हस्ते गडचिरोली – चिमूर लोकसभेचे इंडिया आघाडीचे उमेदवार डॉ. नामदेव कीरसान यांच्या प्रचार कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी नागभिड तालुक्यांतील व परिसरातील हजारो नागरिकांची उपस्थिती होती.

## आणीबाणी सारखी परिस्थिती देशात निर्माण झाली–खा.सुळे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

सर्वाच्च न्यायालय आयकर विभाग, ईडी, सीबीआय यांचा गैरवापर तसेच निवडणुकीची प्रक्रिया यावर अनेक प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. ही बाब नागरिकांसाठी वेदनादायी व चिंताजनक आहे. आणीबाणी देशात लागू नाही परंतु तशी परिस्थिती निर्माण झाल्याची चर्चा दबक्या आवाजात समाजात सुरु आहे. ही बाब लोकशाही देशासाठी घातक विषय आहे. दडपशाहीच्या दिशेने पाऊले टाकली जातात का? अशी सातत्याने काळजी सरकार घेत असलेल्या काही निर्णयातून होत आहे. देशाचे संविधानासाठी ही चिंताजनक बाब असून त्याच्या विरोधात आमची लढाई आहे असे मत खासदार सुप्रिया सुळे यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले आहे.

# १७-परभणी लोकसभा मतदार संघा साठी ५ उमेदवारांचे ७ अर्ज दाखल





लोकनेता न्यूज नेटवर्क

**परभणी । प्रतिनिधी**

आजपर्यंत ८५ उमेदवारांना ११४ नामनिर्देशन अर्जाचे वितरण परभणी लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने १७-परभणी लोकसभा मतदार संघ निवडणुकीसाठी आज ५ उमेदवारांनी ७ नामनिर्देशन अर्ज दाखल केले आहेत. आजपर्यंत एकुण ९ उमेदवारांचे १८ नामनिर्देशन अर्ज स्विकारण्यात आले आहे. तर आज २४ उमेदवारांना २७ नामनिर्देशन अर्जांचे वितरण करण्यात आले आहे. आतापर्यंत एकूण ८५ इच्छुक उमेदवारांना ११४ नामनिर्देशन अर्जाचे वितरण करण्यात आले असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी रघूनाथ गावडे यांनी दिली आहे.१७-परभणी लोकसभा मतदार संघासाठी आज दि. ०२ एप्रिल रोजी जानकर महादेव जगन्नाथ (राष्ट्रीय समाज पक्ष), बोबडे सखाराम ग्यानबा (अपक्ष), मुस्तफा मैनोदीन शेख (अपक्ष), राजन रामचंद्र क्षीरसागर (कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया) यांनी प्रत्येकी एक नामनिर्देशन अर्ज दाखल केले आहे. तर जाधव संजय (बंडू) हरिभाऊ (शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे)) यांनी तीन नामनिर्देशन अर्ज दाखल केले असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी रघुनाथ गावडे यांनी दिली. यावेळी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी रघुनाथ गावडे, अपर जिल्हाधिकारी डॉ. प्रताप काळे, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी दत्तु शेवाळे यांनी उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र दाखल करुन घेतले. उमेदवारांना गुरुवार, दि.४ एप्रिलपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते ३ यावेळेत आपले नामनिर्देशन पत्र सादर करता येणार आहे. शुक्रवार, दि. ५ एप्रिल रोजी नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात येणार असून, सोमवार, दि. ८ एप्रिल, २०२४ पर्यंत उमेदवारांना आपले अर्ज मागे घेता येणार आहे. तर शुक्रवार, दि. २६ एप्रिल रोजी १७-परभणी लोकसभा मतदार संघासाठी मतदान होणार आहे. या निवडणूकीचा निकाल मंगळवार दि. ४ जून रोजी लागणार आहे.

## हिंगोली लोकसभा निवडणुकीसाठी आज शेवटच्या दिवशी ५१ अर्ज दाखल

### आज ८ उमेदवारांना २५ नामनिर्देशन पत्राचे वितरण



लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली । सय्यद रहीम रजा**

लोकसभा निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याचा आजच्या शेवटच्या दिवशी ५१ अर्ज दाखल झाले आहेत. आतापर्यंत एकूण ७७ अर्ज दाखल झाले असल्याची जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी माहिती दिली आहे. आज नामनिर्देशनपत्र वितरण व स्विकृतीच्या शेवटच्या दिवशी ८ उमेदवारांना २५ अर्जांचे वितरण करण्यात आले असून, आतापर्यंत एकूण १११ इच्छुक उमेदवारांना ३९९ नामनिर्देशनपत्रांचे वितरण करण्यात आले आहे.

शुक्रवार, दि. ५ एप्रिल रोजी नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्यात येणार असून, सोमवार, दि. ८ एप्रिल २०२४ रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस आहे.

## रुख्मिनबाई बोराडे यांचे निधन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मंठा । प्रतिनिधी**



येथील रुख्मिनबाई नागोराव बोराडे यांचे बुधवार ता. ३ रोजी सं ध्या का ळी हृदयविकाऱ्यांच्या धक्क्याने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ५५ वर्षे होते. त्यांच्यावर मंठा येथील शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. ज्ञानेश्वर उर्फ माऊली बोराडे यांच्या त्या आई होत. त्यांच्या पश्चात पती नागोराव बोराडे, मुलगा ज्ञानेश्वर व तीन मुली, जावई, सुना नातवंड असा परिवार आहे..

## फकीरबा गणपत दांडगे दु:खद निधन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**दानापूर । राम शिंदे**



भोकरदन तालुक्यातील दानापूर येथील फकीरबा गणपत दांडगे वय ५३ आज दिनांक ४-४-२०२४रोजी अल्पशा आजाराने मृत्यू झाला आज संध्याकाळी पाच वाजता दानापुर स्मशानभूमी मध्ये अंत्यविधी करण्यात आले त्यांच्या पश्चात आई पत्नी भाऊ मुले मुली असा मोठा परिवार होता.

## चारोळी

शिकण्याला वय नसावे
काहीतरी नवीन शोधत बसावे
नावीन्याच्या शोधात फसावे
कणभर गवसले तरी हसावे.


रंजना सानप
मायणी (सातारा)

## मध्यप्रदेश इंदूर मराठी साहित्य व कला महोत्सवात कवी संमेलनाच्या अध्यक्षपदी : कवी प्रा.वा.ना.आंधळे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**जळगाव । ज्ञानेश्वर बुधवत**

२७ वा पद्मभूषण तात्यासाहेब सरवटे आणि राजकवी गोविंदराव झोकरकर स्मृती तीन दिवसीय मराठी साहित्य आणि कला महोत्सव इंदूर (इंदौर) शहरात दि. १३,१४ आणि १५ एप्रिल रोजी संपन्न होत असून महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवी तथा वक्ते प्रा.वा.ना.आंधळे यांची उपस्थिती प्रमुख मान्यवर व कवीसंमेलनाचे अध्यक्ष म्हणून लाभणार आहे.



मराठी भाषा संरक्षण समितीच्या विद्यमाने सदरचा महोत्सव प्रीतमलाल दुवा सभागृह कलादालनात होणार आहे. सुप्रसिद्ध चित्रकार स्व.एम.जी.किरकिरे यांच्या स्मरणार्थ १३ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजता माळव्यातील मराठी कलावंताच्या निवडक कलाकृतीयुक्त तीन दिवसीय चित्र, मूर्ती व छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन संपन्न होत असून त्यामध्ये सुमारे पन्नास कलाकारांच्या निवडक उत्कृष्ट कलाकृती प्रदर्शित केल्या जाणार आहेत. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन ग्वाल्हेरचे कलामर्मज्ञ प्रमोद जोशी यांच्या शुभहस्ते होणार आहे. विशेष अतिथी शिक्षणतज्ञ पराग खेर असतील. यावेळी वयाची ७५ वर्षे ओलांडलेले सुप्रसिद्ध छायाचित्रकार चंद्रकांत पुणतांबेकर, पद्माकर गाडे तसेच जेष्ठ चित्रकार शंकर शिंदे, तरुण छायाचित्रकार दिलीप भालेराव या महानुभावांना गौरविण्यात येणार आहे.त्याच दिवशी सायंकाळी ६ वाजता सभागृहात तीस मराठी लेखक-कवींचा मागील वर्षातील पुस्तक प्रकाशनासह साहित्यात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल गौरव करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध कवी तथा ओजस्वी वक्ते प्रा.वा.ना.आंधळे (जळगाव) तसेच विशेष अतिथी म्हणून जेष्ठ पत्रकार, लेखक अजय बोकील (भोपाळ), व्यंगचित्रकार यशवंत गोरे (भोपाळ), डॉ.रवि गिऱ्हे (नागपूर), शरद भोकरदनकर (मुंबई) उपस्थित राहणार आहेत.दि.१४ एप्रिल रोजी सकाळी ०९:३० वाजता कवी प्रा.आंधळे यांच्या अध्यक्षतेखाली मध्यप्रदेशातील नामवंत कवींचे कविसंमेलन संपन्न होत आहे. याच दिवशी सायंकाळी होणारा जेष्ठ चित्रकर्मीचा प्रात्यक्षित कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य खुला असणार आहे असे महोत्सवाचे आयोजक तथा मराठी भाषा संरक्षण समिती इंदूरचे समन्वयक अनिलकुमार धडवईवाले यांनी एका प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकान्वये कळविले आहे.

## पाटोदा पोलीस स्टेशनची दमदार कारवाई

# १२ जुगाऱ्यासह २,०६,२४० रुपये किमतीचा मुद्देमाल केला जप्त

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**




पाटोदा पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.अनमोल केदार यांना दिनांक ०३/०४/२०२४ रोजी गोपनीय माहिती मिळाल्याने श्री.अनमोल केदार यांनी आपल्या अधिपत्या खालील स्टाफ पोलीस उपनिरीक्षक श्री.गाडे, श्री.काटकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक वाघ, पोलीस हवालदार जायभाय, काकडे, पोलिस अंमलदार कोळेकर, पठाण यांना सदरची माहिती कळवून पंचासह कारवाई करण्याकरिता तात्काळ घटनास्थळी रवाना केले. सदरची हि कारवाई मौजे दासखेड येथे करण्यात आली असून दासखेड येथील नदीच्या बाजूला असलेल्या झाडाखाली जुगाराचा खेळ चालू असताना पाटोदा पोलीस स्टेशनच्या स्टाफने अचानकपणे छापा मारला असता काही इसम चाहूल लागल्यावरून मोकळ्या रानात पळाले असता त्यांचा पाठलाग करून त्यांना पकडण्यात आले. सदरच्या ठिकाणी एकूण १२ आरोपी जुगार खेळ पैशावर खेळत असताना मिळून आले. सदरच्या कारवाई मध्ये पांडुरंग संदीपान कोकाटे(वय ५१ वर्षे), साहेबराव किसन कोकाटे(वय ५५ वर्षे), अनिल सिताराम कोकाटे(वय ६० वर्षे), लक्ष्मण भगवानराव मोरे(वय ३८ वर्षे), दत्तात्रय बन्सीधर कोकाटे(वय ४४ वर्षे), सुभाष शांतीलाल वाघीरे(वय ५६ वर्षे), दत्तात्रय बापुराव कोकाटे(वय ४८ वर्षे), हरीभाऊ भिमराव कोकाटे(वय ५२ वर्षे), प्रशांत आण्णासाहेब कोकाटे(वय ४४ वर्षे), गणेश मारोती कोकाटे(वय ४५ वर्षे), रमेश काकासाहेब कोकाटे(वय ३१ वर्षे) सर्व रा.दासखेड ता.पाटोदा व अनिल विठ्ठल बाबर रा.हिंगणी ता.करमाळा जि.सोलापुर यांना ताब्यात घेतले असून बेकायदेशीरपणे पत्त्यावर पैसे लावुन स्वतःच्या फायद्यासाठी तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असताना जुगाराचे साहीत्य रोख ११२४०/- रुपये व जुगार खेळण्यासाठी येण्या जाण्या साठी वापरलेल्या ०४ मोटार सायकल किमत १,९५,०००/- रुपये असा एकुण २,०६,२४०/- रुपये सह मुद्देमालासह जप्तीची कारवाई करून सदर आरोपीतांविरुद्ध कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार कायदा प्रमाणे पोलीस उपनिरीक्षक श्री.माधव नारायण काटकर यांच्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन पाटोदा येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस अधीक्षक श्री.नंदकुमार ठाकूर, मा.अप्पर पोलीस अधीक्षक श्री.पांडकर साहेब, मा.उपविभागीय पोलीस अधिकारी अभिजीत धाराशिवकर, यांच्या मार्गदर्शनाखाली पाटोदा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.अनमोल केदार, पोलीस उपनिरीक्षक श्री.भागवत गाडे, पोलीस उपनिरीक्षक श्री.माधव काटकर, सहाय्यक फौजदार बाळासाहेब वाघ, पोलीस हवालदार सुनील जायभाय, पोलीस हवालदार संतोष काकडे, पोलिस अंमलदार सचिन कोळेकर व रियाज पठाण यांनी केली आहे.

संपादकीय

# कुलगुरू, तुम्हीसुद्धा ?




लोकनेता न्यूज नेटवर्क

महाराष्ट्रातील विद्यापीठे जगात अव्वल ठरावीत यासाठी कुलपतींनी व्यक्त केलेली अपेक्षा एकीकडे आणि गैरव्यवहारांच्या आरोपांचे अंधारलेले वास्तव दुसरीकडे. या दोन्हीत पडणाऱ्या अंतराचा गांभीर्याने विचार जेवढ्या लवकर होईल, तेवढे चांगले.राजकीय क्षेत्राचा आपल्याकडे किती ऱ्हास झाला आहे, याची चर्चा वारंवार होत असते; पण शिक्षणासारख्या पवित्र मानल्या जाणाऱ्या क्षेत्रातही कशी बजबजपुरी माजली आहे, याचा जेव्हा प्रत्यय येतो, तेव्हा चिंतेचे मळभ आणखी गडद होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे नाव लावणाऱ्या नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू सुभाष चौधरी यांना कुलपती या नात्याने राज्यपाल रमेश बैस यांनी निलंबित केले. अशा कारवाईची ही कदाचित पहिलीच घटना असेल.वास्तविक उच्च न्यायालयाने त्यांच्या कारभारावर ताशेरे ओढल्यानंतरच नैतिकतेच्या भूमिकेतून त्यांनी राजीनामा दिला असता, तर ही नामुष्की टळली असती. पण तसे झाले नाही. शिक्षणाची गंगा किती 'मैली' झाली आहे, या समस्येची चर्चा यामुळे पुन्हा सुरू झाल्यास नवल नाही. याचे कारण ही सुटी घटना नाही. एका दुखण्याचे लक्षण आहे. ते दुखणे आहे, शिक्षणक्षेत्राच्या दुरवस्थेचे. शैक्षणिक दर्जाच्या ऱ्हासाचे.निलंबित करण्यात आलेल्या या कुलगुरूमहाशयांवर विद्वतपरिषद ,व्यवस्थापन परिषद, अधिसभा अशा विद्यापीठाशी संबंधित यंत्रणांनीही आक्षेप घेतले होते. मग विधान परिषदेतही प्रश्न उपस्थित झाला. सरकारने त्याची दखल घेत चौकशीसमिती घोषित केली. या समितीने त्यांना दोषी ठरवले. कोट्यवधींची कंत्राटे त्यांनी अवैधरीत्या दिल्याचा संशय आहे.

या महाशयांवर कारवाई करण्यापूर्वी त्यांनी पदावरून दूर व्हावे, असा पर्याय राज्यपालांनी तसेच या विद्यापीठाशी संबंधित उच्चपदस्थांनी त्यांच्यासमोर ठेवलाही होता. पण ते पदाला चिकटून राहिले. शिक्षणक्षेत्राच्या बाजारूपणावर हा अनवस्था प्रसंग बोट ठेवतोच, शिवाय कुलगुरुनिवडीच्या प्रक्रियेविषयीही काही प्रश्न उभे करतो.'जिसकी लाठी उसकी भैस' या न्यायाने 'ज्यांची सत्ता, त्यांचा कुलगुरू' हा प्रकार आता रुढ झाला आहे. खरे तर निवडसमितीला सोयीचा कुलगुरु करण्याचे सांगावे दिले जातात हे आता जनता जाणते. कुठलीही राजवट त्याला अपवाद नाही. जातीपातीचे प्रस्थ सध्याच्या राजकारणात किती आहे, हे नव्याने सांगायला नको. दुर्दैवाने शिक्षणक्षेत्रातील नेमणुकाही त्याला अपवाद नाहीत.विद्यापीठांमध्ये संघटित प्राध्यापक संघटनांची दंडेली ही डोकेदुखी झाली आहे. अशाच एका तथाकथित 'अराजकीय मंचा'तील कुणा ताईंच्या शिफारशीमुळे नागपूर विद्यापीठात सदर महाशयांची नियुक्ती झाल्याचे सांगण्यात येते. या सगळ्या घडामोडी पाहता शिक्षणाचा दर्जा वाढवण्याच्या उपाययोजना सुचवणे अन् त्या अमलात आणणे हे सध्याच्या कुलगुरूंना आपले कर्तव्य आहे, असे वाटते की नाही, असाच मूलभूत प्रश्न निर्माण झाला आहे.चढे शिक्षणशुल्क आकारणारी खासगी विद्यापीठे गुणवत्तेची वाहक झाली आहेत अन् शासकीय विद्यापीठे खानेसुमारीची! अध्ययन- अध्यापनाचा दर्जा उत्तम असेल तर भारताला 'लोकसंख्या लाभांशाचा' लाभ होईल; अन्यथा नाही, याचे सोयरसुतक न बाळगता कुलगुरू प्रशासकीय कामकाजातच जास्त गुंततात. काही अपवाद असतीलही. पण एकूण चित्र भयावह आहे.अभ्यासक्रमातील नावीन्य, जागतिक दर्जाशी नाते सांगणे याचे भान पार मागे पडले आहे. परीक्षा व्यवस्थापन, कर्मचारीभरती, बिंदूनामावली याकडे लक्ष देणे एकेकाळी संपूर्णतः 'शैक्षणिक' असलेल्या कुलगुरूपदाचे काम होऊन बसले आहे. ही कामेही ते योग्यप्रकारे पार पाडत नाहीत, अशी स्थिती आहे. महाराष्ट्रातील विद्यापीठांच्या ना परीक्षा वेळेत होताहेत, ना निकाल योग्यवेळी लागताहेत.नागपूरच नव्हे राज्यातील अन्य शहरे, महानगरांतही विद्यापीठ स्तरावर दर्जाची घसरण जाणवते आहे. नागपूर विद्यापीठ यापूर्वीही तत्कालीन उपकुलसचिवाने केलेल्या गैरव्यवहारांमुळे बदनाम झाले होते. आता कुलगुरूंमुळे. सत्ताधारी एकीकडे गुणवत्तेचा आग्रह धरणारे रोजगारप्रधान नवे शैक्षणिक धोरण राबवण्याच्या तयारीत असताना उच्चशिक्षण संस्थांतील नियुक्त्या-नेमणुकांच्या बाबतीत मात्र एवढा ढिसाळपणा का दाखवत आहेत, हेही एक कोडेच आहे.डावे- उजवे हा संघर्ष विद्यादानातही डोकवायला हवाच का? अशाने चांगले निर्णय बाजूला पडतात अणि कॅम्पसमधल्या अशैक्षणिक गोंधळांची चर्चाच जास्त होते. त्यातून साऱ्या शिक्षणक्षेत्राचीच प्रतिमा मलिन होते. आता कायद्यानुसार या प्रकरणाची चौकशी करून प्रकरण तडीला न्यायला हवे. कोविडकाळात परीक्षा हवी की नकोचे राजकीय खेळ रंगले. आता आपलीच माणसे घालत असलेला गोंधळ उच्चशिक्षण खात्याला सावरावा लागणार आहे.आपलेच दात अन् आपलेच ओठ. महाराष्ट्रातील विद्यापीठे जगात अव्वल ठरावीत, यासाठी कुलपतींनी व्यक्त केलेली अपेक्षा एकीकडे आणि गैरव्यवहारांच्या आरोपांचे अंधारलेले वास्तव दुसरीकडे. या दोन्हीत पडणाऱ्या अंतराचा गांभीर्याने विचार जेवढ्या लवकर होईल, तेवढे चांगले.

# वाढती नोकरकपात काय सांगते ?




लोकनेता न्यूज नेटवर्क

भारतातल्या आजच्या श्रमबाजाराचे स्वरुप बदलते आहे. 'शैक्षणिक पार्श्वभूमी' आणि 'अनुभव' या जुन्या (पारंपारिक) प्रतिमानाकडून श्रम बाजार 'विशेष कौशल्य' या नव्या प्रतिमानाकडे हळूहळू सरकू लागला आहे. आय.टी क्षेत्रातील अलीकडच्या काळातील नोकरकपातीच्या पार्श्वभूमीवर हे बदलाचे वास्तव लक्षात घेण्याची नितांत गरज आहे.देशाच्या आर्थिक प्रगतीच्या मुळाशी असतो रोजगार. त्यातूनच उत्पन्न, उपभोग, बचत आणि गुंतवणूक या साऱ्या गोष्टी सुकर होतात. केवळ 'जीडीपी'ची पताका खांद्यावर घेऊन किती काळ नाचायचं? पण बऱ्याच वेळा उत्पादन वाढूनदेखील रोजगार वाढत नाही. कारण अशा परिस्थितीत यंत्र, तंत्रज्ञान श्रमिकांच्या कामाची जागा बळकावतात. यातून सुरू होते नोकरकपात, म्हणजेच ढोबळ अर्थाने 'ले ऑफ'.खरे तर अर्थव्यवस्थेतल्या चढ उताराबरोबर 'ले ऑफ'देखील स्वाभाविकच म्हणायला हवा. त्याचे स्वरुप छोट्या कालावधीसाठी असेल तर कपाळाला आठ्या कशाला? मात्र ही नोकरकपात दीर्घकाळ चालू राहिली आणि कंपनीच्या धोरणाचा ती अविभाज्य भाग बनली, तर परिस्थिती गंभीर होते.भारतात २०२० पासून आयटी कंपन्यांमध्ये सुरू झालेली नोकरकपात २०२३ मध्ये टोकाला जाऊन १०४ कंपन्यांनी १९ हजार ९२१ श्रमिकांना कामावरून काढून टाकले आहे. पुढल्या तीन वर्षांत भारतीय आयटी क्षेत्रात होऊ शकणारी नोकरकपात प्रतिवर्षाला पावणेदोन लाख ते दोन लाख एवढ्या मोठ्या संख्येने होणार, असे एक अभ्यासअहवाल सांगतो.यात अल्फा बेट, शेल, स्पोर्टस इलस्ट्रेटेड, ॲमेझॉन, मॅके, मायक्रोसॉफ्ट, सिटी ग्रुप, इबे, टाटा मोटर्स, एचडीएफसी यांसारख्या मोठ्या कंपन्या आघाडीवर आहेत. आयटी क्षेत्राबरोबरच वित्तीय सेवाक्षेत्र, दूरसंचार, ऑटोमोटिव्ह इंडस्ट्री, स्टार्टअप उद्योग या साऱ्याच क्षेत्रात नोकरकपातीची अहमहमिका सुरू आहे. ही समस्या खरे तर जागतिक आहे. उदाहरणार्थ, २०२३ या वर्षात ११९० टेक कंपन्यांनी केलेली नोकरकपात २.६२ लाखांच्या घरात होती.अगदी नऊ फेब्रुवारी २०२४ पर्यंत १३८ टेक कंपन्यांनी ३४ हजार श्रमिकांना कामावरून कमी केल्याचे दिसते. २०२३ मधील एकूण जागतिक नोकरकपातीत एकट्या अमेरिकेचा हिस्सा ७० टक्के होता. त्यानंतर अनुक्रमे भारत, जर्मनी, स्वीडन आणि ब्रिटनचा क्रमांक लागतो.नोकरकपातीला अनेक घटक कारणीभूत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या तंत्रज्ञानाच्या वापराचा श्रमबाजारावर पर्यायाने नोकरकपातीवर काय परिणाम झाला आहे आणि होऊ शकतो? मॅकेन्झींच्या एका अभ्यासानुसार 'जनरेटिव्ह एआय' आणि अन्य तंत्रज्ञानाच्या वापरामध्ये श्रमिक करत असलेल्या कामाचे ६० ते ७० टक्क्यांच्या प्रमाणात 'ऑटोमेशन' शक्य आहे.'नॅशनल ब्युरो ऑफ इकनॉमिक रिसर्च'' या संस्थेतील प्राध्यापक ऍकमोग्लू व डेव्हिड ऑटर या दोघांनी स्वयंचलित तंत्रज्ञानाचा 'श्रमविस्थापन' आणि 'श्रम उत्पादकता' या दोन बाबींवरच्या परिणामांचा अभ्यास केला. त्यांच्या मते एका बाजूला स्वयंचलित उत्पादनप्रक्रियेतून विस्थापित झालेले श्रमिक त्या क्षेत्रातील एकूण उत्पादकता वाढल्यामुळे उत्पादनव्यवहारांची नवीन क्षेत्रे निर्माण करतात.जी क्षेत्रे बिगरस्वयंचलित असल्यामुळे विस्थापित झालेल्या श्रमिकांसाठी नवीन नोकऱ्या निर्माण करतात. यातून या क्षेत्रात श्रमाला असलेली मागणी वाढूनवेतनदेखील वाढू शकते. माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात 'एआय' वापराचा प्रतिकूल परिणाम 'सॉफ्टवेअर टेस्टिंग' आणि 'पायाभूत सुविधांचे व्यवस्थापन' या दोन व्यवहारांच्या बाबतीत दिसून येतो.याउलट स्वयंचलित तंत्रज्ञानाचा उपयोग करणे कठीण असलेल्या 'आयटी कन्सल्टन्सी' व 'सॉफ्टवेअर डिझाईन' यासारख्या श्रमप्रधान क्षेत्रांमध्ये श्रमिकाची उत्पादकता अधिक असल्याने रोजगार वाढण्याची शक्यता वाढते. 'कॉंप टीआयए' कंपनीच्या अभ्यासानुसार बिगरस्वयंचलित उद्योगात डिसेंबर ते जानेवारीच्या काळात ३३ हजार ७२७ नवीन नोकऱ्यांची निर्मिती झाली आहे.'ले ऑफ डॉट फाय' यांच्या अभ्यासानुसार २०२४ च्या सुरवातीपर्यंत 'टेक उद्योगा'त ३२ हजार श्रमिकांच्या नोकऱ्या गेल्या आहेत. २०२० पासून भारतात चालू असलेली नोकरकपात अन्य काही घटकांमुळेही सुरू राहिली आहे. उदाहरणार्थ : आर्थिक घसरणीचा (उणे ७.७ टक्के) नोकरकपातीवर परिणाम झालेला दिसतो.'सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी' या संस्थेच्या २०२० मधील सर्वेक्षणानुसार एप्रिल ते सप्टेंबर या कालावधीत १.९ कोटी एवढी पगारी नोकऱ्यांची कपात झाली. अनेक वेळा कार्याची, विभागांची कंपन्या पुनर्रचना करताना तात्कालिक नोकरकपात होते.अधिक प्रगत स्वयंचलित तंत्रज्ञानामुळे श्रमप्रधानतंत्राला पर्यायी व्यवस्था निर्माण झाल्यामुळे भारतात नोकरकपात झाल्याचे दिसून येते. उदाहरणार्थ, 'नॅसकॉम'च्या २०२२ मधील अहवालानुसार स्वयंचलित तंत्रज्ञानामुळे कमी कौशल्य असलेल्या ३० लाख नोकऱ्या गमवाव्या लागल्या आहेत.भारतीय कंपन्या ठरविलेले वित्तीय उद्दिष्ट गाठू शकत नसतील व त्यांची एकूण कामगिरी निराशाजनक असेल तर खर्च कमी करण्याच्या दृष्टीने कंपन्यांनी नोकरकपात केल्याचे दिसते. 'डेलॉइट इंडिया'नुसार, गेल्या वर्षी ४२ टक्के भारतीय कंपन्यांनी 'खर्च कमी करायचा'प्रभावी उपाय म्हणून नोकरकपातीचा मार्ग स्वीकारलेला दिसतो.बऱ्याच वेळा कंपन्यांच्या 'व्यूहरचने'त विभागवार किंवा श्रमिकाच्या कामाच्या स्वरुपानुसार काही बदल झाले तर नोकरकपात झालेली दिसते या संदर्भात लिंक्ड इन इंडिया''चे एक सर्वेक्षण असे सांगते, की महासाथीनंतर ३८ टक्के भारतीय कंपन्यांनी व्यवसायाचे स्वरुप बदलल्यामुळे मोठ्या प्रमाणावर नोकरकपात केली. नोकरी जाण्यानं केवळ त्या व्यक्तीपुरतेच आर्थिक, सामाजिक, मानसिक परिणाम होत नसतात.

अल्पकालावधीत त्यामुळे ग्राहकांचा रोजचा खर्च कमी होऊन उत्पादन घटू शकतं. दीर्घ कालावधीत अर्थव्यवस्थेतील गुंतवणूक घसरू शकते. यामुळे त्याचा प्रतिकूल परिणाम आर्थिक विकासदरावर होऊ शकतो. दीर्घकालीन नोकरकपातीतून बेरोजगारी वाढत जाऊन दारिद्र्याची समस्या अधिक गंभीर होत जाते. यातून समाजव्यवस्थेत एकूणच अनागोंदी माजून, समाजस्वास्थ्य बिघडत जाते. श्रमिकाची अवस्था गोंधळाची होऊन ताण, असुरक्षितता, वेगवेगळे मानसिक आजार या सगळ्या प्रतिकूल परिणामांना ती व्यक्ती बळी पडू शकते.अशा परिस्थितीत नोकरकपातीची कुऱ्हाड कोसळलेल्या व्यक्तीनं आपला बहुतांशी वेळ सत्कारणी लावून आपल्यावर हे संकट का ओढवले आहे, याच्या कारणांचा तार्किक विचार केला पाहिजे. भारतातल्या आजच्या श्रमबाजाराचे स्वरुप बदलते आहे. 'शैक्षणिक पार्श्वभूमी' आणि 'अनुभव' या जुन्या (पारंपारिक) प्रतिमानाकडून श्रम बाजार 'विशेष कौशल्य' या नव्या प्रतिमानाकडे हळूहळू सरकू लागला आहे.'स्किल फास्ट हायरिंग' हा नवा दृष्टिकोन श्रमबाजारातल्या अपेक्षांना गवसणी घालतो आहे. या संदर्भात अलीकडचा 'पिरिऑडिक लेबर फोर्स सर्व्हे' असे निरीक्षण मांडतो, की '१५ ते ५९' वयोगटातील ८६ टक्के व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे व्यावसायिक प्रशिक्षण मिळालेले नाही. त्यामुळे नवीन कौशल्य प्राप्त करणे, असलेल्या कौशल्यात भर घालणे, नवीन प्रशिक्षणाची अपेक्षा बाळगणे या गोष्टी कराव्याच लागतील.या संदर्भात खासगी संस्थांप्रमाणेच सरकारची भूमिका महत्त्वाची असणार आहे. जसे 'एआय' आणि 'मशिन लर्निंग'मुळे उत्पादनप्रक्रिया स्वयंचलित होणार आहे, अशा वेळी स्वयंचलित ते बिगर स्वयंचलित हा विस्थापित श्रमिकांसाठी असलेला मार्ग अधिक कोणत्या पद्धतीने सुकर होईल, हा पाहिले पाहिजे. त्यातली सकारात्मकता आणि ठोस प्रभावी धोरण नोकरकपातीत घट घडवून आणेल. केवळ तंत्रज्ञानाला विरोध करून हे साधणार नाही.

# 'जंगलच्या कायद्या'तून वनांची तूर्त सुटका



लोकनेता न्यूज नेटवर्क

'जंगल' शब्दाची व्याख्याच बदलून दिखाऊ विकासाच्या नावावर 'रान मोकळे' करून देण्याचा डाव, सर्वोच्च न्यायालयाने एका अंतरिम निर्णयाने नुकताच थोपवला आहे. सजग नागरिकांनी हा सर्व प्रकार समजून घ्यायला हवा. याचे कारण जंगले हा कोट्यवधी लोक अवलंबून असणारा मूलस्रोत आहे.आजवर अनेकदा भारतीय निसर्ग-पर्यावरण विनाशकारी शासकीय निर्णयांमुळे धोक्यात आले. बहुतांश वेळी पर्यावरणाची खंबीरपणे पाठराखण केली ती सर्वोच्च न्यायालयानेच. गेल्या आठवड्यातील निर्णय हे त्याचे ताजे उदाहरण. दिखाऊ विकासाच्या नावावर केंद्र सरकारचा 'जंगल' शब्दाची व्याख्याच बदलून धनदांडग्यांना शब्दशः 'रान मोकळे' करून देण्याचा डाव न्यायालयाने एका अंतरिम निर्णयाने थोपवला.जंगले हा आपला सर्वाधिक महत्वाचा, कैक कोटी लोक अवलंबून असणारा आणि हवामानबदल थोपवणारा मूलस्रोत आहे. भारतात फक्त २१% भूभागावर वने शाबूत आहेत,त्यातली फक्त १२.३७% सलग,अनाघ्रात निबिड/घनदाट किंवा दाट आहेत.अशा व्याख्या-बदलामुळे ह्या सर्व जंगलांपैकी २८% वनांचे संरक्षण निकाली निघून ती मानवी धंदे करण्यासाठी मोकळी होत होती.अभ्यासूपणे केलेले पर्यावरणविषयक कायदे बदलून किंवा त्यांना वळसा घालून विकासाच्या नावाखाली सरकारकडून निसर्ग-पर्यावरणाचा विनाश चालू आहे. त्यातली पुढची कडी म्हणजे १९८० चा 'वन संवर्धन कायदा' बदलणारा नवा कायदा २०२३ मध्ये सरकारने प्रस्तावित केला होता.तो गेल्या जुलै-ऑगस्टमध्ये संसदेत मंजूरही झाला होता.बदलाची उद्दिष्टे स्पष्ट करताना सरकारने त्याची व्याप्ती, सर्वोच्च न्यायालयाच्याच आधीच्या एका पथदर्शी निर्णयातील जंगल शब्दाच्या व्याख्येमुळे अवाजवी वाढते आहे ,असे विधान केले होते. हा आधीचा निर्णय म्हणजे 'गोदावर्मन तिरूमलपाद विरुद्ध भारत सरकार-१९९६' या निकालात केलेली वन शब्दाची व्याख्या.महिलांचा लैंगिक छळ रोखणाऱ्या 'विशाखा विरुद्ध राजस्थान सरकार' या खटल्याच्या निकालाला जे स्थान भारतीय महिलांच्या सक्षमीकरणात आहे, तेच स्थान भारतीय पर्यावरणात गोदावर्मन निकालाला आहे. साहजिकच या नव्या वनसंवर्धन कायद्यातील तरतुदींना आव्हान देणारी याचिका निवृत्त वनाधिकाऱ्यांच्या संघटनेने 'वनशक्ती' आणि 'गोवा फाऊंडेशन' या संस्थांसमवेत सर्वोच्च न्यायालयात दाखल के.त्याच्या सुनावणीदरम्यान जंगलाची व्याख्या अशी बदलायला न्यायालयाने प्रतिबंध केला. आता पुढील सुनावणी जुलै २०२४ मध्ये आहे;पण त्याआधी केंद्र,राज्य आणि पर्यावरण मंत्रालय यांना सर्वोच्च न्यायालयाने काही स्पष्ट आदेश दिले आहेत. त्यांचे तपशील पाहण्याआधी गोदावर्मन निकाल सरकारला इतका का खुपतो ते पाहू.भारतीय वने आणि जंगले यांत कोणतीही वनेतर उठाठेव/उपद्व्याप करण्यास सदर निकाल प्रतिबंध करतो.तसेच तो सांगतो की, वन/जंगल यांची व्याख्या, त्या भूभागाची मालकी कुणाची आहे किंवा त्याचे सरकारी वर्गीकरण काय आहे हे न पाहाता शब्दकोशात दिलेल्या व्याख्येप्रमाणे करावी. या व्याख्येत वैधानिक नोंद झालेल्या,- मग ती वने आरक्षित असोत, राखीव असोत किंवा नसोत- येतील.फॉरेस्ट एरिया या संज्ञेत फक्त शब्दकोशातील अर्थानुसारची वनेच नव्हे तर सरकारीदरबारी जंगल अशी नोंद झालेला कोणताही भूभाग, तो कुणाच्याही मालकीचा असला तरी येईल. मोठ्या आवाक्याच्या व्याख्येनुसार व्याख्यांकित झालेले कोणतेही जंगल वन संरक्षण कायद्याच्या कलम-दोन खाली येईल.ज्यानुसार कोणतेही राज्य सरकार अथवा यंत्रणा त्याचा कोणताही वनेतर वापर केंद्राच्या अनुमतीविना करू शकणार नाहीत. कलम-दोन असेही सांगते की, राज्ये कोणत्याही औद्योगिक अथवा व्यावसायिक उपद्व्यापासाठी हे आरक्षण (परवानगीविना) उठवू/रद्द करू शकणार नाहीत. (त्या काळी सरकार पर्यावरणहितैषी होते).१९९६ च्या या मूळ निकालात न्यायालयाने राज्य सरकारांना असेही आदेश दिले होते, की अशा व्याख्येखाली राज्यातील कोणते भूभाग समाविष्ट होऊ शकतील ते समित्या स्थापन करून पक्के करावे. आज २७ वर्षांनीही फार कमी राज्यांनी हे काम पूर्ण केले आहे; आणि ह्याचाच फायदा सरकार उठवू पाहात आहे/ होते. विद्यमान केंद्र सरकारच्या नव्या प्रस्तावित कायद्यात ही व्याख्याच बदलणे, ही पहिली विनाशकारी गोष्ट होती.तसे झाल्यास देशातील सुमारे १ लाख ९७ हजार चौ.किमी. जंगल, १९९६ नुसारच्या व्याख्येच्या बाहेर जात होते. (म्हणजेच मानवी धुडगूस घालायला तिथे परवानगी मिळत होती.) आणि दुसरी तितकीच विनाशकारी गोष्ट म्हणजे अनेक वनेतर गोष्टी करायला त्यामुळे अनुमती मिळत होती.ह्यात वरकरणी कल्याणकारक अशा दोन गोष्टींआड दडून सरकार हा विनाश घडवू पाहत होते.पहिले म्हणजे 'लोकशिक्षण आणि जागृती' साठी विविध जंगलांमध्ये प्राणी-संग्रहालये उभी करणे आणि 'सफारीं'ना परवानगी देणे. या दोन्हींमागे त्यांसाठी लागणाऱ्या मोठ्या आस्थापना, बंदिस्त प्राण्यांसाठी पिंजरे, विद्युत-पुरवठा तारा, हॉटेले, रस्ते, दुकाने पार्किंग जागा, ओपन एअर थिएटर्स, हे सर्व मागील दरवाज्याने वनविनाश घडवत येणार होते.वनांकडून मिळणाऱ्या नैसर्गिक सेवा आणि भांडवल नष्ट होत हे सर्व होणार होते. आणि दुसरी म्हणजे कुणाची बोलती बंदच व्हावी अशी गोष्ट-'राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाच्या' च्या प्रकल्पांना, वनांमध्ये अधिकृत अथवा अनधिकृत आंतरराष्ट्रीय सीमेपासून १०० किमीच्या आत परवानगी. आपल्याकडे हे 'जादुई' शब्द उच्चारले की कुठेही काहीही उभे करण्याचा अघोषित परवाना मिळतो.भले त्याचा संबंध सुरक्षेशी दूरान्वयानेही का नसेना! पैकी प्राणी- संग्रहालये उभी करणे आणि 'सफारी'बाबत कोर्टाने त्यांच्या परवानगीखेरीज काहीही करायला मनाई केली. याचिकाकर्त्यांच्या वकीलांनी ताज्या 'फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडिया'चा हवाला देत सांगितले की, २०२३चा कायदा लागू केल्यास देशातील एकूण सात लाख १३ हजार चौ.किमी. जंगलांपैकी एक लाख ९७ हजार १५९ चौ.किमी इतके वृक्षआच्छादन (जे वन म्हणून अधिकृत नोंद झालेले नाही) ते गोदावर्मन व्याख्येच्या बाहेर जाऊन असंरक्षित होईल.मागील वर्षी अधिकृत उच्चस्तरीय समितीनेच हे दाखवून दिले होते,की भारतात प्रचंड मोठे वनाचे पट्टे हे ना नोंद झालेले आहेत, ना संरक्षित आहेत. बने,पानसरी हे कर्नाटकातले; गैर मुमकिन पहाड हे हरयाणातले; ओरान, रुंध आणि देव-वन हे राजस्थानातले पट्टे ही अशा काही भूभागांची उदाहरणेही त्यांनी दर्शवली होती. ही सर्व वने केवळ गोदावर्मन निकालाने अधिकृत नसूनही मानवी उठाठेवींपासून संरक्षित रहात होती.नव्या प्रस्तावित कायद्याचे समर्थन करताना गेल्या वर्षी पर्यावरण मंत्री भूपेन यादव ह्यांनी 'गोदावर्मनमुळे जंगलात आदिवासींच्या मुलींसाठी एखादी शाळाही उभी करता येत नाही हो!' असा सोईस्कर गळा काढला होता.पण मुळात 'वन हक्क अधिकार कायदा २००६ शाळा, दवाखाने, अंगणवाड्या आदी गोष्टींसाठी जंगल वळवण्याची परवानगी देतो. त्यासाठी व्याख्या बदलण्याची गरज नाही.सर्वोच्च न्यायालयाने काढलेले आदेश स्पष्ट आहेत. राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी तज्ज्ञ समित्यांच्या द्वारा, १९९६ च्या निकालानुसार राज्यातील सर्व प्रकारचे सर्व वन निश्चित करून त्या नोंदी पर्यावरण खात्याला ३१ मार्चपर्यंत द्यायच्या आहेत. संबंधित खात्याने त्या आपल्या संकेतस्थळावर १५ एप्रिलपर्यंत प्रकाशित करायच्या आहेत.पुढील सुनावणी जुलै २४ मध्ये होईल. निदान तोपर्यंत वने सुरक्षित आहेत म्हणायची.

# हिंगोली लोकसभेसाठी ७७ उमेदवारी अर्ज दाखल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

हिंगोली लोकसभा मतदारसंघात दि ४ एप्रिल गुरुवारी आत्तापर्यंत ७७ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत विशेष म्हणजे येथील जागा महायुतीला असतानाही भाजपच्या तीन उमेदवारांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केले त्यामुळे आता त्यांची उमेदवारी अर्ज माघारी नंतरच स्पष्ट होणार आहे,

हिंगोली लोकसभा मतदार संघामध्ये उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी मागील दोन दिवसापासून राजकीय पक्षाच्या प्रमुख उमेदवारासह अपक्षनाही गर्दी केली होती शिवसेनेचे (उ बा ठा) उमेदवार नागेश पाटील आष्टीकर यांनी शक्ती प्रदर्शन करीत बुधवारी दि ३ एप्रिल रोजी उमेदवारी अर्ज दाखल केला या शिवाय काही अपक्ष उमेदवारानाही अर्ज दाखल केला त्यानंतर आज शिवसेना (शिंदे )सेनेचे उमेदवार बाबुराव कदम कोहळीकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शक्तिप्रदर्शन करून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे दरम्यान हिंगोलीच्या जागा महायुतीमध्ये शिवसेना (शिंदे गटा) सोडण्यात आली आहे विद्यमान खासदार हेमंत पाटील यांच्या उमेदवारी वर भाजपाने अक्षप घेतल्यानंतर शिवसेना ( शिंदेगट) सेनेने ऐनवेळी उमेदवारीची माळ बाबुराव कदम कोहळीकर यांच्या गळ्यात टाकली आहे त्यांनी आज उमेदवारीअर्ज दाखल केला मात्र भाजपच्या दिव्यांग आघाडीचे प्रदेश प्रकोष्ठ रामदास पाटील सुंठाणकर यांनी मागील तीन ते चार वर्षापासून निवडणुकीची तयारी केली होती त्यांना भाजपने उमेदवारी दिली नसल्याने त्यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला यावेळी भाजपचेही कार्यकर्ते उपस्थित होते याशिवाय भाजपचे योगी श्याम भारती महाराज व माजी जिल्हाध्यक्ष एडवोकेट शिवाजीराव जाधव यांनी ही उमेदवारी अर्ज दाखल केला यावेळीही भाजपचे काही कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते भाजपच्या तीन उमेदवारांनी उमेदवारीअर्ज दाखल केल्याने पक्षाला डोकेदुखी ठरणार असल्याचे चित्र दिसून येत आहे आता उमेदवारी मागे घेण्याच्या दिवशी कोण अर्ज मागे घेणार, का भाजपमध्ये बंड होणार का हे चित्र स्पष्ट होणार.





# वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जोरदार शक्ती प्रदर्शन करत डॉक्टर बी डी चव्हाण यांचा उमेदवारी अर्ज दाखल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली । भगवान जाधव**



वंचित बहुजन आघाडीचे हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार डॉक्टर बी डी चव्हाण यांचा उमेदवारी अर्ज हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत शक्ती प्रदर्शन करत हिंगोलीच्या जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये भरण्यात आला हिंगोली लोकसभा मतदारसंघांमध्ये भाजप महायुतीकडून शिवसेना शिंदे गटाचे बाबुराव कदम कोळेकर तर महाविकास आघाडी कडून नागेश पाटील आष्टीकर तर रामदास पाटील सुमठाणकर यांनी बंड करत अपक्ष म्हणून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे, त्याचबरोबर दत्तशिखर संस्थांचे माहूर गडाचे श्याम भारती महाराज यांनी सुद्धा आपला उमेदवारी अर्ज भरला आहे त्याचबरोबर शिवाजीराव मुंजाजीराव जाधव यांनी सुद्धा आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे काय प्रत्येकच उमेदवाराने आपला अर्ज दाखल करत असताना आपली ताकद दाखवून देण्याचा प्रयत्न केला परंतु वंचित बहुजन आघाडीने आपली वेगळी ताकद दाखवून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे यावेळी छत्रपती शिवाजी महाराज व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून ढोल ताशाच्या गजरामध्ये हिंगोली शहरातून रॅली काढून जिल्हाधिकारी कार्यालयावर उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी दाखल झाले यावेळी मतदारसंघातून सर्व जाती धर्मातील नागरिकांनी डॉक्टर बी डी चव्हाण यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी रॅलीमध्ये सहभाग नोंदवला , याप्रसंगी अधिकृत उमेदवार डॉक्टर बी डी चव्हाण सुरेश धोत्रे वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा अध्यक्ष अनिल कांबळे वसंत दादा खंदारे रवींद्र वाढे रमेश भुजबळ प्रकाश गव्हाणे नरेश कोकरे माथाडी कामगार संघटनेचे अफजल शेख उत्तम मामा करवंदे कांचन खंदारे राहुल करवंदे पप्पू खंदारे सोनू आर्वीकर परविन बाराते व इतर ही हजारो कार्यकर्ते या रॅलीमध्ये सहभागी झाले होते ही रॅली पाहून अनेकांच्या भुवया उंचावल्या त्यामुळे आता हिंगोली लोकसभा मतदारसंघांमध्ये चौरंगी लढत होण्याची दाट शक्यता आहे

# श्रद्धा कॉम्प्लेक्सचा पहिल्या मजल्यावरील कठडा कोसळला;जीवित हानी टळली

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अनिलकुमार गोठी । मलकापूर**

मलकापूर बुलढाणा रोड मार्गावरील स्टेट बँक समोर असलेल्या श्रद्धा कॉम्प्लेक्स पहिल्या मजल्याचा कठडा कोसळला व तळमजल्या समोरील दुकानासमोर त्याचा मलबा पडला त्या कचऱ्याच्या खाली धान्य विक्री करण्यासाठी शेतकरी व धान्य व्यक्तींची नेहमी वर्दळ असते परंतु त्यावेळी कोणीही तिथे उपस्थित नसल्याने जीवितहानी तळली

सदर बाबी संदर्भात न प कार्यालयात काही दुकानदारांनी तक्रार केली असता तेथील अधिकाऱ्यांनी कोणतीही कारवाई केली नसल्याने नागरिकात रोज उत्पन्न झाला असल्याचे चित्र आहे

सन १९९८ साली श्रद्धा कॉम्प्लेक्स ची निर्मिती करण्यात आली असून तळमजला व वरील दोन मजल्यावर ७३ दुकाने तर चौथ्या मजल्यावर निवासाची व्यवस्था केली आहे मात्र बांधकामाला निकृष्ट दर्जाचे काम असल्याने कित्येक वेळा पडझड होते मात्र सध्या कॉम्प्लेक्स चा मालक त्याकडे दुर्लक्ष करतो व त्याची डागडुजी सुद्धा करण्यात येत नाही त्यामुळे इमारत कधी जमीन होतं होईल याची शाश्वती नाही कित्येक व्यवसायिकांनी आपल्या तक्रारी मलकापूर न प कडे नोंदविल्या आहेत मात्र त्याकडे न प प्रशासन लक्ष देत नाही त्यामुळे एखादे वेळेस इमारत कोठून मोठ्या प्रमाणात जिभेत व वित्तीय हानी झाल्यावर न.प. या सध्या कॉम्प्लेक्स च्या मालकाचा सत्कार तर करणार नाही ना असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

# निवडणूक सामान्य निरीक्षक यांची सिंदखेड राजा येथे आढावा भेट

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**



बुलढाणा लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणूक सामान्य निरीक्षक पी.जे.भागदेव आणि निवडणूक कायदा व सुव्यवस्था पोलीस निरीक्षक मा. सेंथील कृष्ण यांचे बुलढाणा जिल्ह्यात आगमन झाले असून त्यांनी आज सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघाला भेट देऊन त्यांनी मा. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्यासमवेत बुलढाणा लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आढावा घेतला.

निवडणुकीच्या अनुषंगाने सर्व स्तरावरील प्रशिक्षण पूर्ण झाले आहे, मतदान यंत्रे सुरक्षा कक्षामध्ये सुरक्षित आहेत तसेच CCTV च्या सुरक्षितेविषयी खातरजमा श्री. भागदेव यांच्याकडून करण्यात आली. मतदानासाठी दिव्यांग, महिला आणि युवा अशी आदर्श मतदान केंद्र करण्यात येणार असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी प्रा. खडसे यांनी दिली. निवडणुकीच्या अनुषंगाने फिरते पथक, स्थिर पथक यांची संख्या सद्यस्थितीमध्ये पुरेशी आहे, आंतर जिल्ह्याच्या ठिकाणी चेक पोस्ट सक्रिय आहे, C-vigil ॲपवर येणाऱ्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी एक नवीन टीम गठीत करण्यात आली आहे, इत्यादी विषयाचा आढावा घेण्यात आला.

निवडणूक कायदा व सुव्यवस्था ( पोलीस निरीक्षक) मा. सेंथील कृष्ण यांनीसुद्धा सिंदखेडराजा विधानसभा मतदार संघातील कायदा व्यवस्था, संवेदनशील मतदारसंघ, मागील कोणता अनुचित प्रकार घडला होता का याबद्दल आढावा घेतला.आजच्या आढावा दौऱ्यामध्ये तहसीलदार सिंदखेड राजा श्री. सचिन जैस्वाल, तहसीलदार देऊळगावराजा वैशाली डोंगरजाळ , उपविभागीय अभियंता बी. एन. काबरे, नायब तहसीलदार देऊळगाव राजा अस्मा मुजावर, पोलीस निरीक्षक सिंदखेडराजा ब्रम्हदेव शेळके उपस्थित होते

# काँग्रेसच्या अनेक नेत्यांचा भाजपा आणि शिवसेनेला छुपा पाठिंबा-संजय शिरसाट

## मेदवार कमजोर असेल तर जागा बदलता येईल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**



काँग्रेसच्या अनेक नेत्यांचा भाजपा आणि शिवसेनेला छुपा पाठिंबा आहे, असा दावा संजय शिरसाट यांनी केला. ते पुढे म्हणाले की, मात्र, फक्त पक्षाचे नाव असल्यामुळे ते तसे दाखवत नाहीत. काँग्रेसमध्ये कुठेही एकवाक्यता नव्हती, त्यामुळे त्यांचा पाठिंबा कायम असतो. त्यामुळे आम्ही नेहमी सांगत होतो की, काँग्रेसचे बडे नेते आमच्या संपर्कात आहेत. आताही काहीजण छुपा पाठिंबा देत असून लवकरच त्यांचा पक्ष प्रवेश होईल, असे सूचक विधान संजय शिरसाट यांनी केले.

लोकसभा निवडणूक जाहीर झाली. मात्र, अद्यापही महायुतीमध्ये नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदारसंघावरून शिवसेना भाजपामध्ये रस्सीखेच सुरू असल्याचे चित्र आहे. या जागेचा तिढा सुटण्यासाठी शिवसेना शिंदे गट आणि भाजपाच्या नेत्यांच्या बैठका सुरू आहेत.काही दिवसांपूर्वी काँग्रेसला महाराष्ट्रात मोठा धक्का बसला. अशोक चव्हाण यांनी काँग्रेसमधून भाजपात प्रवेश केला. तर त्याआधी मिलिंद देवरा यांनीही काँग्रेसला सोडचिठ्ठी देत शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला होता. त्यामुळे ऐन निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसला धक्क्यावर धक्के बसले. यातच आता शिवसेना शिंदे गटाचे नेते संजय शिरसाट यांनी सूचक विधान केल्यामुळे चर्चा रंगल्या आहेत.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबरोबर प्रदीर्घ बैठक घेतली. सर्व जागा निवडून आणण्यासंदर्भात चर्चा झाली. आता बैठका कमी होत असून शिवसेनेच्या जागा शिवसेनेकडेच राहणार आहेत. पहिल्या टप्प्यातील निवडणुकीची रणनीती आखली गेली आहे. महायुतीचे मेळावे घेण्याचे आदेश दिले आहेत. महायुतीमध्ये तिढा नाही. १६ ते १८ जागा लढण्याची तयारी आमची होती, १६ पेक्षा कमी जागा मिळणार नाहीत. नाशिकची जागा शिवसेनेला मिळणार असून उमेदवार कमजोर असेल तर जागा बदलता येईल, असे शिरसाट म्हणाले.

# निवडणुकीतील गैरप्रकारांवर लक्ष ठेवण्यासाठी स्थिर सर्वेक्षण पथक जारी - प्रा. संजय खडसे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

लोकसभा निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर बुलढाणा लोकसभा मतदारसंघातील सिंदखेडराजा विधानसभा क्षेत्रामध्ये निवडणुकीसाठी नियोजनबद्ध तयारी चालू झाली आहे, मा. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे आदेशानुसार स्थिर सर्वेक्षण पथकाची (डडढ) स्थापना करण्यात आली. तसेच मा. तहसीलदार सिंदखेडराजा श्री. सचिन जैस्वाल, मा. तहसीलदार देऊळगाव राजा वैशाली डोंगरजाळ, नायब तहसीलदार सिंदखेड राजा देऊळगावराजा अस्मा मुजावर, श्री मनोज सातव नायब तहसीलदार सि.राजा यांच्या मार्गदर्शनाखाली हे पथक काम करणार आहे, या पथकावर नोडल अधिकारी म्हणून डॉ. श्रीकृष्ण वेणीकर, गट विकास अधिकारी (इऊज) पंचायत समिती सिंदखेड राजा यांची नियुक्ती केली आहे.

लोकसभा निवडणुकीदरम्यान उमेदवार आणि राजकीय पक्षांचा निवडणूक खर्च व निवडणुकीतील गैरप्रकारांवर लक्ष ठेवण्यासाठी स्थिर सर्वेक्षण पथक (SST) काम करत असते, सिंदखेड राजा हे बुलढाणा जिल्हा लोकसभा मतदारसंघाचे शेवटचे टोक असून येथून मराठवाड्यातील जालना जिल्हा सुरू होतो. जालना तसेच छत्रपती संभाजीनगरहून येणाऱ्या गाड्यांची तपासणी करण्यासाठी या पथकांची स्थापना करण्यात आली आहे.

आज दिनांक ४ एप्रिल २०२४ रोजी सिंदखेडराजा येथील बोराखेडी बावरा समृद्धी महामार्ग एक्झिट पॉईंट तसेच दुसरबीड येथील नागपूर समृद्धी महामार्ग एक्झिट पॉईंट येथील पथकाची पाहणी करून त्यांना मार्गदर्शक सूचना आज श्री. वेणीकर यांनी दिल्या.

दुसरबीड येथील समृद्धी महामार्ग एक्झिट पॉईंट वर श्री. एच. वाय. देशपांडे, श्री. एम. यू. थोरवे, फोटोग्राफर गणेश काटकर, कॉन्स्टेबल राठोड हे कर्मचारी येथे उपस्थित होते . सिंदखेडराजा येथील बोराखेडी १२ एक्झिट पॉईंट वर श्री. अनिकेत राठी, श्री. राहुल खेडेकर , श्री. उदय खराते इत्यादी कर्मचारी उपस्थित होते. प्रसार माध्यम मध्ये अंकुश मस्के, श्री.उ.व्ही.गरकळ, श्री.पी.सी. शिंदे. भुमापक, श्री.एस.एस. सोनुने.महसूल साहाय्यकश्री.आर.बो. खरात, कोतवाल हे काम पाहत आहे.







# गहाण खत ऐवजी,खरेदी खत करणाऱ्या सावकारावर गुन्हा दाखल करण्याची मागणी




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर । सुनील वैद्य**

गहाण खत करण्याऐवजी खरेदी करून फसवणूक करणाऱ्या सावकारावर गुन्हा दाखल करण्याची मागणी

राज्यघटना बचाव संघर्ष संघाच्या वतीने करण्यात आली आहे .

मराठवाड्याची राजधानी असलेल्या छत्रपती संभाजीनगर व परिसरात मोठ्या प्रमाणात सावकारचा सुळसुळाट वाढल्याने गोरगरीब जनतेची पिळवणूक होत आहे . सावकारांच्या जाचाला कंटाळून नागरिक त्रस्त झाले आहे. अशीच काही घटना छत्रपती संभाजी नगरात घडल्याचे समोर आले आहे .

गहन खत करण्याऐवजी खरेदी खत करून व्यवहारात फसवणूक केल्याप्रकरणी सावकार अशोक किसन कथवटे( रा.एन-११ हडको) छत्रपती संभाजीनगर याची लाच लुचपत विभागामार्फत चौकशी करून सावकारी कायद्याअंतर्गत तात्काळ गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी राज्यघटना बचाव संघर्ष संघाचे जिल्हा अध्यक्ष गणेश महाले यांनी निवेदनामार्फत केली आहे . सदरील सावकाराचा व्हिडिओ व्हायरल झालेला असून त्या व्हिडिओ मध्ये सावकार स्पष्ट टक्केवारीची भाषा बोलताना दिसत आहे . या कुटुंबासह अशा कित्येक गोरगरीब कुटुंबाची फसवणूक करून त्याने गडगंज संपत्ती जमा केली असेल . याची देखील चौकशी करण्यात यावी . व अशा फसवणूक करणाऱ्या व गोरगरिबांचे रक्त पिणाऱ्या सावकारावर गुन्हा दाखल करण्यात यावा अशी तक्रार पूनमसिंग कपूरसिंग सुलाने यांनी राज्यघटना बचाव संघर्ष संघ समिती कडे करण्यात आली असून राज्यघटना बचाव संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष गणेश महाले यांनी पोलीस आयुक्त यांना निवेदन देत सावकारावर तात्काळ गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे

# महागाईच्या झळा भोकरदन तालुक्यात चारा महागल्याने बळीराजा हवालदिल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । शेख जफर**



भोकरदन तालुक्यातील वाढत्या महागाईचा झळ शेतकऱ्यांना बसत आहे जनावरांना लागणारा चारा आता महागला असून पशुधन जगवण्याचे आवाहन शेतकऱ्यांसमोर असताना कडब्याचा भाव प्रति शेकडा २५०० ते ३००० हजार रुपये असा झाल्याने बळीराजा हवालदील झाला आहे ज्वारीचा पेरा कमी झाल्याने चारा उपलब्ध होत नसून कडब्याचे भाव वधारल्याने शेतकरी त्रस्त झाले आहेत अनेक शेतकरी दुसऱ्या गावातून मिळेल त्या भावात चारा खरेदी करीत असल्याचे चित्र ग्रामीण भागात दिसत आहे जनावरांना पोषक चारा म्हणून कडब्याला मागणी असते कडब्याच्या पैशातून पुढील पीक घेण्यासाठी दोन पैसे मिळतील ही अशा शेतकरी वर्गाला असते तर त्यांच्याकडे बैल जोडी अथवा गाई म्हशी आहेत असे शेतकरी आपल्या जनावरांप्रती ज्वारीचा पेरा करतात अनेक शेतकरी खुरपणी काढणी कडबा बांधणी या भानगडीत न पडता हरभरा सोयाबीनची पेरणी करतात त्यामुळे ज्वारीचा पेरा आपल्याला कमी क्षेत्रात असल्याने यंदा कडबा भाव खात आहे बैलगाडी ट्रॅक्टर आदी वाहनांनी हा कडबा खळ्यात गोट्यापर्यंत नेण्यासाठी पशु पालकांमध्ये लगबग सुरू आहे कडव्याचे दर प्रति शेकडा २५०० ते ३००० हजार रुपये पोहोचले आहेत तर दूध व्यवसायिकांना या दरवाढीचा फटका बसला आहे दुभत्या जनावरांसाठी कडबा आवश्यक आहे वाढत्या दरामुळे चारा खरेदी कमी झाली आहे

परिणामी चारा दरवाढीमुळे दुधाचे दर वाढण्याची शक्यता आहे असे दुधव्यवसाईकांनी सांगितले भोकरदन तालुक्यातील साठवण तलाव हे लघु आणि मध्यम प्रकल्पाचे आहेत त्या सर्वांची पाणी पातळी क्षमतेने तळ गाठला आहे त्यामुळे या साठवण तलावावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांना चारा पिकांची लागवड शक्य झाली नाही बाजारात पुरवट्यापेक्षाही मागणी अधिक झाल्याने भाववाढ होत चालली आहे बाजारात कडब्याला मागणी अधिक असते साधारण मार्च ते जून पर्यंत कडब्याची खरेदी विक्री होते जनावरांसाठी वाळलेला सकस आहार म्हणून कडब्याकडे पाहिले जाते त्यामुळे दूध व्यवसायिक शेळी पालन करणारे शेतकरी वर्ग कडब्याला प्राधान्य देत आहे

### दूध चारा आणि खर्चाचा मेळ बसेना

हिरवा चारा बाजारात आहे मात्र त्याची किंमत गगनास बिडलेली आहे सध्या हिरव्या चाऱ्याचे दर खूप वाढलेले आहे हिरव्या चारासाठी पेंडी ३० ते ३५ रुपये झाली आहे दूध देणाऱ्या जनावरांसाठी दिवसाला आठ ते दहा पेंड्यांचा बंदोबस्त करून ठेवावा लागतो त्यामुळे दिवसाला जवळपास साडेतीनशे रुपये या जनावरांसाठी खर्च करावा लागत आहे दुधाचा व्यवसाय करणारे पशुपालक अत्यंत अडचणीत सापडले आहे

**बालाजी गायकवाड ,दूध व्यवसायिक, फत्तेपुर**

हिरवा चारा दुखत्या जनावरांसाठी उपयुक्त असतो पाणी नसल्यामुळे चारा पिकांची लागवड झाली नाही त्यामुळे चाऱ्याचा तुटवडा जाणवत आहे कडबा आणि हिरव्या चाऱ्यांची टंचाई शेतकऱ्यांसाठी अडचणीची ठरली आहे खरीप हंगामातील मक्का बाजरी या पिकांचा चारा शेतकऱ्यांनी साठवला आहे तूर गव्हाचे भुस पशुखाद्य म्हणून वापरले जात आहे पौष्टिक खाद्य म्हणून कडब्याला पसंती असते पण दर वाढल्यास खरेदीवर परिणाम होणार आहे

**चारा लागवड क्षेत्रात कमालीची गट**

चारा उत्पादन असलेल्या भागात कडव्याचे दर कमी आहेत तालुक्यात २२ ते २५ रुपयांना पेंढी आहे हिरवा चारा तुलनेत कमी आहे सध्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर झाला आहे उन्हाळी चारा पिके घेण्यासाठी पाणी उपलब्ध नसल्यामुळे कडब्याचे दर वाढण्याची शक्यता आहे यावर्षी चारा पिकाच्या लागवड क्षेत्रात कमालीची घट झाल्यास चित्र आहे

**आप्पासाहेब जाधव, शेतकरी प्रल्हादपूर**

### जनावरांचा बाजार आला तेजीत

दुखत्या जनावरांना सांभाळणे पशुपालकांसाठी अत्यंत कठीण होत असल्याचे चित्र सध्या भोकरदन तालुक्यात आहे जनावरे सांभाळणे तर दुखते जनावरांपेक्षाही अवघड आहे होणारा खर्चाचा विचार करता ही जनावरे बाजारात नेऊन विकलेली बरी असा विचार आता पशुपालक शेतकरी वर्ग करत असल्याचे पाहायला मिळत आहे

**कडबा दराने खरेदीवर परिणाम**

# डॉ.राजेंद्र सानप 'उत्कृष्ट कार्य गौरव' पुरस्काराने सन्मानित



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

उत्कृष्ट कार्य गौरव पुरस्काराने गुरूवर्य ह.भ.प.भगवान महाराज सार्वजनिक वाचनालय इंद्रप्रस्थ कॉलनी बीडचे संस्थापक डॉ.राजेंद्र सानप यांना प्रमुख मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. दिनांक ०२ एप्रिल मंगळवार रोजी पुर्णानंद जीवनरस सारथी डॉ.पारनेरकर महाराज मंदिर व स्वा.से.ड.वामनराव वझे वाचनालय बीडच्या वतीने उत्कृष्ट कार्याबद्दल उत्कृष्ट कार्य गौरव पुरस्काराने गुरूवर्य ह.भ.प.भगवान महाराज सार्वजनिक वाचनालय इंद्रप्रस्थ कॉलनी बीडचे संस्थापक डॉ.राजेंद्र सानप यांना जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी पंचायत समिती बीड सौ.प्रणितीताई गंगाखेडकर यांच्या हस्ते पुरस्कार, ग्रंथसंच व शाल देवून सन्मानित करण्यात आले. या वेळी वेदमुर्ती अमोल शास्त्री जोशी, चंपावती महाविद्यालयाच्या प्राचार्य कुलकर्णी मॅडम, मंदिर समिती अध्यक्ष श्री.अशोकराव वझे व कार्यक्रमाचे आयोजक श्री. विनायक वझे, श्री.जोशी सर यांच्या सह इतर मान्यवर उपस्थित होते.

# निराधार वृद्ध भिक्षुक महिलेला तहसील कार्यालयाने दिला दानत्वाचा हात.!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**



तात्काळ या वयोवृद्ध आजीला स्वस्त धान्य दुकानदाराला धान्य देण्याचे आदेश दिले,या वेळी त्या निराधार,निराश्रीत भिक्षुक वृद्ध महिलेसह उपस्थितांचे डोळे पाणावले असल्याचे पहावयास मिळत होते

**पुरवठा विभागाचे नायब तहसीलदार गणेश मोहिज**

आहो साहेब भिक्षा मागून खाते आता वय झालंय...पोरांना पण सोडुन दिलंय...कोपन तरी द्या.. असा एका निराधार वृद्ध भिक्षुक महिलेने पुरवठा विभागाचे नायब तहसीलदार गणेश मोहिजे यांच्या दालनात टाहो फोडताच आपल्या कर्तव्याची जाणीव असलेले, मोहिजे यांनी वयोवृद्ध आजीची व्यथा ऐकताच तात्काळ त्या गावातील स्वस्त धान्य दुकानदाराला लेखी आदेशित करुन आपले दानत्वाचे हात सदर वृद्धेस धान्य मिळऊन देन्या कामी आल्याने त्या महिलेच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले, हे काळजाला स्पर्श करणारे दृष्य पाहावयास मिळाले आहे.

या आधुनिक युगात देवरूपी अधिकारी कार्यरत आहेत म्हणून तर भोळ्या-भाबड्या व नाहीरे वाल्यांची कामे होत आहेत.आपण कोण आहोत, आणि आपल कर्तव्य काय आहे, याची जाणीव झाली की मानुस निस्वार्थ पणे सर्वसामान्य व्यक्तींना सेवा देतात याचे जिवंत उदाहरण दि.२ एप्रिल रोज मंगळवारी तहसील कार्यालयातील पुरवठा विभागात पाहायला मिळाले आहे.कंधार तालुक्यातील बोरी (बु) येथील चंद्रभागा मठपती या वयोवृद्ध निराधार महिला ज्यांच्याकडे उदरनिर्वाहासाठी भिक्षा मागण्या शिवाय दुसरा पर्याय नाही, भिक्षा मागूनच आपल्या पोटाची खळगी भरावी लागते,शासनाकडून निराधार गोरगरिबांसाठीचा स्वस्त धान्याचा लाभ आपल्याला मिळावा, यासाठी ही वयोवृद्ध महिला तहसील कार्यालयातील पुरवठा विभागात येऊन पुरवठा विभागाचे नायब तहसीलदार गणेश मोहिजे यांच्या कडे टाहो फोडायला लागली,तेव्हा गणेश मोहिजे यांनी आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवत या वयोवृद्ध महिलेस स्वस्त धान्य पुरवठा योजनेत पात्र असल्याचे लक्षात येताच त्याच्या कडून लागणारी कागदपत्रे घेऊन शासनाच्या पात्र योजनेचा लाभ मिळावा यासाठी अर्ज ऑनलाईन पद्धतीने दाखल करुन घेऊन,स्वस्त धान्य दुकानदाराला धान्य देण्याचे आदेश दिले.

# निवडणूक निरीक्षक (खर्च) अन्वर अली यांच्याकडून कनेरगाव नाक्याची तपासणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली । सय्यद रहीम रजा**



हिंगोली लोकसभा मतदारसंघातील वसमत, हिंगोली आणि कळमनुरी विधानसभा मतदारसंघातील निवडणूक निरीक्षक (खर्च) अन्वर अली यांनी आज कनेरगाव नाका येथे भेट देऊन एसएसटी पथकाच्या कामकाजाची तपासणी केली. यावेळी निवडणूक निरीक्षकांसोबत सहायक तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी गणेश वाघ, एसएसटी पथक प्रमुख उपस्थित होते.

हिंगोली लोकसभा मतदार आदर्श आचारसंहिता लागू झाली असून, आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होणार नाही, याबाबत दक्ष राहण्याच्या सूचना श्री. अली यांनी यावेळी पथकातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना केल्या. श्री. अली यांनी यापूर्वी उमरा फाटा येथील तपासणी नाक्याची तपासणी केली होती. तसेच मतदारसंघातील कोणत्याही नाक्याची ते अकस्मातपणे भेट देऊन तपासणी करणार असून, आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन होत आहे की नाही, याबाबतची ते तपासणी करत आहेत. तपासणी नाक्यावर कोणत्याही प्रकारे पथकाकडून दिरंगाई झाल्यास संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे निवडणूक निरीक्षक (खर्च) अन्वर अली यांनी सांगितले. निवडणूक निरीक्षक (खर्च) अन्वर अली यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्या शुक्रवार दि. ५ एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजता जिल्हास्तरीय पथक प्रमुख व खर्च तपासणी पथक आणि मतदारसंघातील वसमत, हिंगोली आणि कळमनुरी विधानसभा मतदारसंघातील सहायक खर्च अधिकारी व खर्च पथकाची आढावा बैठक घेणार आहेत. या बैठकीला येताना सर्व पथक प्रमुख तसेच सहायक खर्च अधिकारी, खर्च पथकांनी येताना संपूर्ण माहिती सोबत ठेवण्याच्या सूचना केल्या आहेत. शिवाय उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांच्या तपशीलाचा आढावा ते घेणार आहेत.

# एम.एस.अर्चना यांच्या कडून स्ट्रॉंग रुम मतमोजणी केंद्राची पाहणी



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली । सय्यद रहीम रजा**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने १५-हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निरीक्षक (सामान्य) श्रीमती एम. एस. अर्चना यांनी आज लिंबाळा मक्ता येथील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात असलेल्या स्ट्रॉंगरूमची पाहणी केली.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. पी. बी. देवसरकर, संपर्क अधिकारी सुनील शिंदे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहायक अभियंता गजानन खोरणे उपस्थित होते.

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाने निवडणूक यंत्रणा सज्ज ठेवली आहे. या व्यवस्थेची पाहणी करण्यासाठी निवडणूक निरीक्षक श्रीमती अर्चना यांनी आज येथील स्ट्रॉंग रुम, मत मोजणी केंद्राला भेट देऊन पाहणी केली.

हिंगोली लोकसभा मतदारसंघाची निवडणूक २६ एप्रिल २०२४ रोजी होत असून, मतमोजणी ४ जून २०२४ रोजी होणार आहे. यासाठी जिल्हा प्रशासन पूर्णपणे सज्ज आहे. प्रत्येक विधानसभा क्षेत्रात निवडणुकीसंदर्भात चोख व्यवस्था करण्यात आली आहे. या अनुषंगाने श्रीमती अर्चना यांनी येथील स्ट्रॉंग रुमची पाहणी करून आढावा घेतला. तसेच मतमोजणी वेळी माध्यम कक्ष स्थापन करण्यात येणार असलेल्या जागेचीही त्यांनी पाहणी केली.

निवडणूक निरीक्षक श्रीमती अर्चना यांनी निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे स्ट्रॉंगरूममध्ये सर्व व्यवस्था आहे का याबाबत पाहणी केली. तसेच विद्युत शॉर्ट सर्कीटमुळे मतदानयंत्रांना हानी होऊ नये याची दक्षता घेण्यासाठी सूचना दिल्या. त्यांनी सीसीटीव्ही यंत्रणा, अग्नीरोधक यंत्रणा, डबल-लॉक सिस्टीम व परिसरातील सुरक्षा यंत्रणेची पाहणी केली. याठिकाणी सिसिटीव्ही, सुरक्षा अलार्म, अग्निशामक यंत्रणा व पुरेसे विद्युत दिवे यांची पाहणी केली. श्रीमती एम. एस. अर्चना यांनी मत मोजणी केंद्रावर स्वच्छतेसह इतर सर्व आवश्यक पायाभूत सुविधेसोबतच उन्हापासून बचावासाठी शेड व पिण्याच्या पाणी या दोन सुविधा प्रामुख्याने उपलब्ध ठेवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

# लोकसभा निवडणूक निरीक्षक जिल्हयात दाखल

## तक्रारी, सूचनांसाठी संपर्क करण्याचे आवाहन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अनिलकुमार गोठी । मलकापूर**

लोकसभा निवडणूकीसाठी निवडणूक निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने तिनही निवडणूक निरीक्षक जिल्ह्यात दाखल झाले आहेत. बुलढाणा लोकसभा मतदारसंघासाठी सामान्य निरीक्षक म्हणून पी.जे. भागदेव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या संपर्क क्रमांक ९९७८४०७९५० असून सर्कीट हाऊसमधील जिजाऊ कक्षामध्ये त्यांचे वास्तव्य आहे. निवडणूक कायदा व सुव्यवस्थेसाठी निरीक्षक म्हणून सेंथिल कृषन्न यांची संपर्क-९४११११२७९२, ९६३९१४६०६६ असून सर्कीट हाऊस मधील अजिंठा कक्षात त्यांचे वास्तव्य आहे. निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून अमित शर्मा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचा संपर्क क्रमांक ८८११००७८७२ असा आहे. त्यांचे वास्तव हे सर्कीट हाऊसमधील सावित्री कक्षात आहे.निवडणूक विषयक तक्रारी किंवा समस्यांबाबत तिनही निरीक्षकांकडे म्हणणे मांडता येणार आहे. नागरिकांनी त्यांच्या निवडणूक विषयक तक्रारी किंवा सूचना असल्यास निरीक्षकांकडे नोंदवाव्यात,

# स्वस्त दुकानाचा परवाना रद्द करण्याची मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अनिलकुमार गोठी । मलकापूर**

मलकापूर स्वस्त धान्य दुकानदाराकडून धान्य मिळत नसल्याने त्याचा परवाना रद्द करण्यात यावा अशी मागणी शहरातील नागरिक सुनील भास्करराव हरण खेडकर यांनी मुख्यमंत्री व संबंधित मंत्रालयाकडे केली आहे

त्यांनी आपल्या निवेदनात पुढे म्हटले आहे की माझ्याकडे रेशन कार्ड असताना सन २०१६ पासून स्वस्त धान्य दुकानदारांनी अन्नधान्याचा पुरवठा केला नाही त्यामुळे मी तहसीलदार व जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या कार्यालयाचे उंबरठे भिजवत आहे मात्र या कार्यालयातील अधिकाऱ्यांनी कागदी घोडे नाचून माझी फसवणूक केली आहे तसेच स्थानिक तहसीलदार हे जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या नावाने खडे फोडून स्वतःचे आर्थिक हित जोपासून स्वस्त धान्य दुकानाची पाठ राखा करीत आहे तरी या प्रकरणाची त्वरित चौकशी करून त्यांचा स्वस्त धान्य दुकानाचा परवाना रद्द करावा अशी मागणी सुनील हरण खेडकर यांनी मुख्यमंत्र्याकडे केलेली आहे

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904